ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 10 | ISSUE - 5 | JANUARY - 2024

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# १८ व्या शतकातील पुणे शहरातील कोतवाली खात्याच्या जमा-खर्चाचे स्वरूप



**डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट**
सहयोगी प्राध्यापक,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे.

## कोतवाली खात्याची स्थापना

अठराव्या शतकात पुण्यात कोतवालीची स्थापना करण्यात आली. कोतवालीची स्थापना करण्यामागे पुण्याची लोकसंख्यावाढ व व्यवहारवृद्धी यांमुळे शहराचे प्रभावी नियंत्रण हे कारण असल्याचे पुष्कर शास्त्री यांनी म्हटले आहे त्यांच्या मते प्राचीन काळातील राष्ट्रकूट शासकांच्या काळात 'कोष्टपाल' या शब्दावरून कोतवाल शब्द तयार झाला आहे. मुघल शहरांसाठी कोतवाल नेमलेले असत. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या काळात कोतवाल या पदाचा संदर्भ येतो. पण पुणे शहरासाठी पोलीस खात्याप्रमाणे कोतवाली व्यवस्था इ.स. १७६४ नंतर निर्माण झाली. त्याच वर्षी बाळाजी नारायण केतकर यास पुण्याचा कोतवाल नेमण्यात आले.[i] कोतवालीसाठी बुधवार पेठेत एक मुख्य चावडी व शहरात इतर ठिकाणी आठ चावड्या होत्या.[ii]

कोतवाली हे स्वतंत्र खाते होते. त्याची रचना व कार्यप्रणाली स्वतंत्र होती. हे खाते पोलीस खाते होतेच, पण त्याहून काहीसे अधिक होते. शहरातील स्वच्छता, बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार, अतिक्रमणे हटविणे, घरांची खरेदी-विक्री व त्यावरील कराची आकारणी, सरकारी आदेशांचे प्रसारण, सांडपाण्याची व्यवस्था करणे, वजन-मापांची तपासणी करणे, गुन्हेगारांची चौकशी, गुन्हेगारांना शिक्षा देणे आदी कामे कोतवाली खात्यास करावी लागत.[iii] पुण्यातील बुधवार पेठेत कोतवाल चावडी नावाच्या इमारतीतून कोतवालाच्या नियंत्रणात हा कारभार चालत असे. मराठ्यांच्या सत्तेच्या अखेरीपर्यंत पुण्यात एकूण मिळून एक मुख्य चावडी व इतर नऊ पेठांत नऊ अशा एकूण दहा चावड्या होत्या. जनार्दन हरी या कोतवालाच्या कारकिर्दीपर्यंत मुख्य चावडी व कसब्यात एक अशा दोनच चावड्या होत्या. इ.स. १७६९ साली केशव बलाल केतकर या कोतवालाच्या कारकिर्दीत नवीन चार चावड्या घालण्यात आल्या.[iv] इ.स. १७८२ साली घाशीराम सावळदास या कोतवालाने नारायण पेठ व शनिवार पेठ या ठिकाणी चावड्या घालण्यात आल्या. घाशीराम सावळदास याने वसवलेल्या नवीन पेठेसाठी आनंदराव काशी या कोतवालाने इ.स. १७९२-९३ साली नवीन चावडी घातली.

- **कोतवाल**

कोतवालाची नेमणूक झाल्यावर त्यास जबाबदारी ठरवून देण्यात येऊ लागली. त्यानुसार प्रकाशित मोडी कागदपत्रांच्या मध्ये असलेली ही कोतवालाचे सनद त्या कोतवालाचे हक्क अधिकार याबाबत भाष्य करते.

१. शहराच्या पेठा व पुरी व कसबे येथील किरकोळ कजिया पेठेचा पेठेस कमाविसदार यांनी मनास आणावा. मातब्बर कजिया असल्यास मनास आणून हरकी गुन्हेगारी कोतवालीकडे घेत जाणे.
२. जिनसांची आमदनी काय याचा अजमास पाहून कम-जाजती तुमचे इतल्याने (सल्ल्याने) निरख (वस्तूंच्या किंमती नोंदींचे पत्रक) करीत जावा. बाजाराचे निरखाची यादी दररोज दप्तरी आणून देत जावी.

३. शहरातील छत्रीस खूम व ताफे जात याजवर सरकारांतून बिगारीची आज्ञा करणे. ते तुम्हास केली जाईल. तुम्ही बिगारीचा बंदोबस्त करणे.

४. पाटदाम दर रुपये १। (सव्वा) रुपया, एक शेला; डाकांस दर टके १।। व नारळ व विडा येणेप्रमाणे अदगज नवा करून देणे. तो तुम्ही देऊन, त्याचा शिरस्ता पेशजी असेल त्याप्रमाणे पैका घ्यावा.

५. पेंढारी, बाजेकरी याजपासून घर व उदीम पाहून रुपया, अर्धा रुपया पेशजीचे शिरस्तेप्रमाणे (पुर्वीप्रमाणे) घेत जाणे.

६. नव्या मापावर शिक्के करून देणे. त्याचा शिरस्ता पेशजीप्रमाणे घेत जाणे. जुन्या मापाची चौकशी करणे.

७. तेल्याच्या घाण्यास दररोज रूके ६३ प्रमाणे घ्यावे. त्यापैकी नेहमी खर्च: ६३ श्री नागेश्वर, ६६ पिरदर्गा २, ६३ चावडी कसब्यांतील. सदरहू पावटका वजा होऊन बाकी जमा होईल, त्यापैकी वरकड चौथेरे व दिवट्या वगैरेस खर्च करणे.

८. दसऱ्यास गोंधळ वगैरे व बकरी याची रेघ व्हावी लागते. त्यावर सरकारचा हक्क ६६आहे. त्याचा शिरस्ता पाहून घ्यावे.

९. भंगेरे याजकडील दरमहा कोतवालीकडे शिरस्त्याप्रमाणे घेत जाणे.

१०. खानेसुमारी (जनगणना) एकंदर तुम्ही करावी आणि झाडा (नोंदींचे पत्रक) राखावा. जाणार-येणार कूळ हे कोतवालाकडे दाखल व्हावे. कमाविसदार पेठेचे आहेत, त्यांनी आपले पेठांतील झाडा तुम्हाकडे द्यावा. एकूण कलमे १० पैकी पैकी पाटदामाचा सव्वा रुपया पेशजीप्रमाणे घ्यावा. शेला अलीकडे घ्यावयाचा शिरस्ता पडला आहे, त्यास कूळ पाहून घेत जावा.

११. रस्त्याचा, गल्लीचा व घराचा कजीया लागेल, त्याचा इन्साफ तुम्ही करून कजीया विल्हेस लावावा.

१२. सोदे जूवा (जुगार) खेळतात, त्यांनी कोतवालाचे चिठ्ठी शिवाय खेळो नये. इतर लोकांनी (कोतवालाची चिठ्ठी नसलेल्यांनी) जूवा खेळू नये. त्यावर सरकारचा अंमल घेणे तो पेशजी (पुर्वीच्या) कोतवालाचे शिरस्तेप्रमाणे घ्यावा.

१३. कोतवालीचे कारभारास चावडीत जागा बुधवार पेठ नेमून दिली असे. कोतवालीचा हिशोब महिन्याचे महिन्यांत सरकारांत देत जाणे.

१४. दौंडी फिरविणे ते कोतवालांनी फिरवावी. शहरांत जागांची खरेदी फ्रोक्त (रोखीने) होईल, ते तुमचे इतल्याने (माध्यमातून) व्हावी.

१५. कोतवालाकडील पत्र करून देऊन सरकारचा दस्तूर आहे तो घेत जाणे.

१६. (रक्कम रू. )३,२६४/-रुपये सालीना करार केले असेत. चौकशीने खर्च करणे.

१७. भोजन खर्च व तैवजखर्च व दप्तर खर्च व रोषणाई जरूरती कार्याला लागेल ती खर्च करून सालाचे-सालांत समजावून मखलाशी (मान्यता किंवा तपासणी) करून घेत जावी.

याप्रमाणे १७ कलमे करारात दिली आहेत.[v] हे पत्र थोरले माधवराव पेशवे यांच्या रोजनिशीतील आहे. या पत्रावरून कोतवालाची कामे, कोतवाली व्यवस्था, कमाविसदारीशी असलेले वेगळेपण इत्यादी बाबी समजतात.

## कोतवाली खात्याच्या जमा-खर्चाचे स्वरूप

कोतवाली विभागाच्या कामांचे स्वरूप पाहता कोतवाली विभागास अनेक बाबींचे उत्पन्न मिळत असे. आणि वरील विविध कामांवर खर्चही केला जात असे. त्याचे विवरण पुढील प्रमाणे पाहता येईल.

## कोतवाली खात्याचे उत्पन्न

**तक्ता १ कोतवालीची कर रुप जमा रक्कम**

| साल इ.स. | मागील शिल्लक | चालू वर्षीची जमा | एकूण |
|---|---|---|---|
| १७६६-६७[vi] | २०१२॥ | १२१४८॥=॥। | १४१६१।=॥। |
| १७८३-८४[vii] | ९८४४।- | ५२७०४६-॥ | ६२५४८।=॥ |
| १७९२-९३[viii] | ८६२ | ४४९७७॥=॥ | ४५८३९॥=॥ |

या तक्त्यावरून कोतवाली खात्याकडे साधारणतः किती रक्कम जमा होत असेल याचा अंदाज येतो. एकूण जमेच्या आकड्यावरून अंदाज येतो की मोठी रक्कम जमा होत होती. ही यंत्रणा शहर संरक्षण व व्यवस्थापन कामासाठी असली तरी येथील जमेचे स्वरूप मोठे होते. या तक्ता १ मधील एकूण जमेच्या दर्भात त्यात अंतर्भूत घटकवार जमेचे स्वरूप यानंतर दिलेले आहे. कोतवालीमध्ये जमा होणारी रक्कम कोणत्या माध्यमातून जमा होत असे त्याची माहिती यातून मिळविता येईल. तक्ता १ मधे दिलेले चालू वर्षी जमेचे घटकवार विवरण पुढील तक्ता २ मध्ये दिलेले आहे.

### तक्ता २ कोतवाली – संबंधित वर्षीची जमा

| क्र. | जमेचा घटक व साल | १७६६-६७[ix] | १७८३-८४[x] |
|---|---|---|---|
| १. | खंड गुन्हेगारी | १००१३6-। | ३५८५१॥।≡॥ |
| २. | कुणबिणी फ्रोख्त | १ | ४२५ |
| ३. | चोरीची सनगे फ्रोख्त | ४० | --- |
| ४. | कोरकोळ जकात | --- | १३२।•। |
| ५. | पाटदाम व शेले | ११३6≡ | २५१।= |
| ६. | कर्ज चौथाई | ३२१॥।•॥ | २९८॥≡ |
| ७. | हरकी | --- | ११२ |
| ८. | कसर | 6= | ३॥।-॥ |
| ९. | सिलकावण व तलबना | ५२॥। | ४॥ |
| १. | दौंडी | --- | १०॥।-। |
| ११. | खानावळ | --- | ३6-॥ |
| १२. | नजर | २१६ | ३९३६॥।= |
| १३. | खाटीक- बद्दल | --- | २४ |
| १४. | जुव्या बद्दल | १६१6= | २८५॥ |
| १५. | बैतलमवेसी | | ४५८०॥-।- |
| १६. | डाक | ५६।=॥ | ८२॥= |
| १७. | ओझेवाले व पेंढारी | ५९। | १८९॥। |
| १८. | वाजंत्री | ३९ | |
| १९. | महाल व घरे आकार | --- | ४००१॥। |
| २०. | अंतस्त | ८९८ | |
| २१. | जासूद- कामगिरी बद्दल | --- | १८॥। |
| २२. | बटछपाई | --- | २३७६ |
| २३. | जप्ती | ८। | ११०॥≡॥ |
| २४. | जोहरी पैदास्त्र | १७ | --- |
| २५. | अमानत ऐवज | ६०॥-। | --- |
| २६. | एकूण | १२१४८॥=॥ | ५२७०४6-॥ |

तक्ता २ मध्ये दिलेल्या दोन वर्षांच्या माहितीवरून कोतवाली व्यवस्थेमध्ये एकूण पंचवीस प्रकारचे कर मिळण्याचे मार्ग दिसतात. तक्ता ५.५ मध्ये पाहता सर्वात मोठे उत्पन्न मिळवून देणारा घटक म्हणून खंड गुन्हेगारी असल्याचे दिसते. त्यानंतर बैतलमवेसी, नजर, बटछपाई आदि बाबी यांचेही उत्पन्न अधिक होते. कोतवालीच्या कामाचे स्वरूप तक्ता २ मध्ये स्पष्ट होत आहे.

- **बटछपाईचा दर –** मात्र नवीन व विशेष बाब म्हणून बटछपाईच्या दराची माहिती पुढीलप्रमाणे- व्यापाऱ्यांची मापे तपासून त्यावर शासकीय शिक्के मारून देण्याचे काम कोतवाली खात्यामार्फत केले जात असे. त्यासाठी स्वतंत्र कारकून नेमलेला असे. इ.स. १७७८-७९ साली बटछपाईचा दर पुढीलप्रमाणे होता.

**तक्ता ३ पुणे शहर कोतवाली – बटछपाईचा दर मापांच्यासाठी इ.स. १७७८-७९**[xi]

| कैली माप | आधोली | निठवे | चिपटे | आदपाई |
|---|---|---|---|---|
| दर | १॥ | ।≡॥ | 6=॥। | 6= |
| अक्षरी दर | दिड रुपया | साडेसहा आणे | पावणे चार आणे | दोन आणे |
| तपासलेली मापे | ४३१ | ३७१ | ३८९ | २१७ |
| जमा रक्कम | ६४१॥ | १७३॥।- | ९१6=॥। | २७6= |

**तक्ता ४ पुणे शहर कोतवाली – बटछपाईचा दर वजनांच्यासाठी इ.स. १७७८-७९**[xii]

| वजनी | शेर | आदशेर | पावशेर | पाच शेरी | अडीच शेरी | दुशेरी | धडे | मनका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दर | ॥ | । | 6= | १॥ | १ | १ | १॥ | १ / ॥ |
| अक्षरी रक्कम | आठ आणे | चार आणे | दोन आणे | दिड रुपया | एक रुपया | एक रुपया | दिड रुपया | एक रुपया / आठ आणे |

या तक्ते क्रमांक ३ व ४ नुसार प्रत्येक वजन-मापाला किती दराने बटछपाई घेतली जात असे याची माहिती मिळते. तक्ता क्रमांक ३ मध्ये मापांच्या दरा बरोबर इ.स. १७७८-७९ साली संपूर्ण वर्षात तपासलेली आणि त्यावर घेतली गेलेली रक्कम यांचाही उल्लेख आहे.

- **चौत्रा व चावड्यानिहाये उत्पन्न**

**तक्ता ५ पुणे शहर – कोतवाली चौत्रा व चावड्या यांचे उत्पन्न**

| ठिकाण | १७८३-८४[xiii] | १७८७-८८[xiv] |
|---|---|---|
| चौत्रा कोतवाल | २०३०४ | १०११९।-॥ |
| चावडी कसबा | २०४३6= | २०८७॥-॥ |
| चावडी वेताळ | ४५३३। | १७६८॥= |
| चावडी गणेशपेठ | ३१५६।•॥ | १५६८॥ |
| चावडी रविवार | ३९८३। | १५०६॥।= |
| चावडी सोमवार | १९०३ | १११४॥ |
| चावडी शनिवार | ५०८७॥।-॥। | १२१०॥ |
| चावडी नारायणपेठ | १९५४॥≡ | २८३२॥ |

पुणे शहरात कोतवालीचे मुख्यालय असे त्यास कोतवाली चौत्रा म्हणत असत. याशिवाय कोतवालीच्या कामकाजासाठी स्थानिक कार्यालय म्हणून कोतवाली चावड्या असत. एकूण दहा चावड्यांचा उल्लेख असला तरी प्रस्तुत प्रबंधासाठी उपयोग केलेल्या कागदपत्रांत सहा चावड्यांचे उल्लेख मिळतात. त्यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती तक्ता ५ मध्ये आलेली आहे.

तक्ता क्र. ५ मधील इ.स. १७८३-८४ व १७८७-८८ सालाच्या आकडेवारीवरून एक बाब स्पष्ट लक्षात येते ती म्हणजे कोतवाली चौत्र्याची कर रुपातील जमा ही कोणत्याही चावडीपेक्षा जास्त असे.

- **कोतवाली खात्याच्या जमा-खर्चाचे स्वरूप -** तक्ता क्र. ६ मध्ये काही वर्षांच्या संदर्भात एकूण जमा, खर्च व शिल्लक यांची माहिती मिळते. तक्ता ६ मधून एक बाब स्पष्ट होते ती म्हणजे पुणे शहरातील कोतवालीमधून शासनास मोठे उत्पन्न मिळत असे. यामध्ये शिल्लक राहणारी रक्कमही अधिक दिसते आहे. यातील खर्चाचे विवरण पुढे तक्ता ४ मध्ये घटकनिहाय देत आहे.

**तक्ता ६ कोतवाली जमा-खर्चाचे स्वरूप**

| साल | एकूण जमा | एकूण खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|
| १७६६-६७[xv] | १४१६१।=॥। | ७४६६6॥ | ६६९५।=। |
| १७८३-८४[xvi] | ६२५४८।=॥ | ४४१२२॥=॥ | १८५०५॥। |
| १७८५-८६[xvii] | ४४२६१6-॥ | १८५८२6-॥ | २५६७९ |
| १७९२-९३[xviii] | ४५८३९॥=॥ | २५७२५॥- | २०११४6-॥ |

## कोतवालीखात्याच्या खर्चाचे स्वरूप

**तक्ता ७ कोतवालीखात्याच्या खर्चाचे स्वरूप**

| **अ.न.** | **१** | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| **साल** | **एकूण खर्च** | **महालमजकूर** | **सरकारभरणा** | **मखलासी देणे** | **खरेदी व इतर खर्च** |
| **१७६६-६७[xix]** | **७४६६6॥** | ३४६८॥•॥ | ३०८९॥ | ७३५6= | १७४ |
| **१७८३-८४[xx]** | **४४१२२॥=॥** | ९६८२6॥- | २८५९१ | ४२२१ | १६२७॥ |
| **१७८५-८६[xxi]** | **१८५८२** | ८९७३।•। | ७०६५॥ | ४४८6≡ | २०९५ 6≡ |
| **१७९२-९३[xxii]** | **२५७२५॥-** | ११९१३।-॥ | ९२७२ | २५९१॥।=॥। | १९४८ |

तक्त ७ मधून लक्षात येते की, कोतवाली खात्याच्या खर्चात महालमजकूर (उभा रकाना क्र. २) या खर्चाचे प्रमाण सर्वाधिक होते. त्याशिवाय सरकारभरणा, मखलाशी देणे, खरेदी व इतर खर्च या बाबींवर खर्च केला जात असे. सरकारभरणा याचा अर्थ मध्यवर्ती शासनाकडे जमा केलेली रक्कम होय. उभा रकाना ३ मध्ये दर्शविलेल्या रकमा या मध्यवर्ती शासनाकडे जमा केकेल्या रकमा आहेत. तक्ता ७ मधील उभा रकाना क्र. १ ते ५ मधील प्रत्येक खर्च शीर्षकाचे विवरण उपविभागणीसह पुढे क्रमश: देत आहे. प्रथम तक्ता ८ मध्ये महालमजकूर खर्चाचे विवरण पाहता येई.

**तक्ता ८ कोतवाली खात्याचा महालमजकूर खर्च**

| **क्र.** | **शिर्षक व उपशिर्षक** | १७६६-६७[xxiii] | १७८३-८४[xxiv] | १७८५-८६[xxv] | १७९२-९३[xxvi] | १८०१-०२[xxvii] |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **एकूण महालमजकूर** | ३४६८॥•॥ | ९६८२6॥- | ८९७३।•। | ११९१३।-॥ | ९०५१। |
| २ | **बद्दल मुशाहिरा** | २५००।•। | ७८०५। | ७१७४।≡ | १०५१७।- | ७६७९ |
| २.१ | -कोतवाल व दरकदार | --- | २१११ | | | ११७१ |
| २.२ | - कारकून | १०६२॥ | १११९।= | उपलब्ध नाही | | १५२५ |
| २.३ | --- सिबंदी प्यादे | १४३७॥।•॥। | ४५७४॥।= | | | ४९८३ |
| ३ | **खेरीज मुशाहिरा** | ९६८6=॥ | १८७६॥=। | १०२४॥।•। | १३९६6॥ | १३७२ |

तक्ता ८ मध्ये महालमजकूर खर्चाचे खेरीज मुशाहिरा व बद्दल मुशाहिरा या दोन भागात विभाजन होते. तक्त्यातील सरासरीत पाहता बद्दल मुशाहिरा खर्च अर्थात वेतन खर्च हा नेहमीच खेरीज मुशाहिरा अर्थात वेतना व्यतिरिक्तचा किंवा प्रशासकीय खर्च यापेक्षा जास्त असे. तक्ता ८ मधील आडवी ओळ २ मध्ये दिलेल्या बद्दल मुशाहिरा खर्चात तीन उपशिर्षके येतात. ती आडवी ओळ क्र. २.१, २.२, २.३ मध्ये दर्शविली आहेत. यामध्ये कोतवाल व दरकदार यांचे वेतन, कारकुनांचे वेतन आणि शिबंदीचे वेतन दर्शविले आहे. आडवी ओळ २.१ ते २.३ मधील माहितीनुसार शिबंदीच्या वेतनावरील खर्च इतर दोन पेक्षा जास्त आहे. याचे कारण शिबंदीला प्रत्येकी मिळणारे वेतन कमी असले तरी त्यांची संख्या जास्त असल्याने वेतन रक्कम जास्त आहे. खेरीज मुशाहिरा (वेतनाशिवायचा व्यय) खर्चातील बाबींचा विचार करता शिधा खर्च, तैवज खर्च, दरबार खर्च, रोशनाई, धर्मादाय इत्यादी खर्चाच्या बाबी येतात.

- **मखलाशी देणे खर्च -** कोतवाली खात्याच्या खर्चाची माहिती देताना तक्ता ७ मधील उभा रकाना ४ मध्ये मखलासी देणे हे शीर्षक आले आहे. त्याचे विवरण तक्ता ९ मध्ये पुढील प्रमाणे दिले आहे. मखलाशी देणे या अंतर्गत पागा, साहित्य खरेदी,

गणपती उत्सव, शिपाई, बैल भाडे, रद्द कर्ज या बाबींवर खर्च केला जातो. यामध्ये बैल भाडे या उपशीर्षकात बैल भाडे खर्च रु. ९३ आला आहे. तो ९३ रु खर्च पेशव्यांच्या कुटुंबातील रमाबाई यांच्यासाठी मागविलेल्या वस्तूंसाठी आलेला बैल भाडे खर्च आहे.

**तक्ता ९ कोतवाली खात्याच्या खर्चातील मखलाशी देणे अंतर्गत खर्च**

| शिर्षक व उपशीर्षक | १७६६-६७[xxviii] | १७८३-८४[xxix] |
|---|---|---|
| **एकूण मखलासी देणे** | **७३५६=** | **४२२१** |
| पागा ऐन जिन्नस | ३५५ | -- |
| देने / साहित्य खरेदी | ८२।= | ३६॥। |
| गणपती उत्सव | ४५ | -- |
| कारकून / शिपाई | १५९ | ३८। |
| बैल भाडे (रमाबाईच्या प्रवासासाठी) | ९३ | -- |
| रद्दकर्ज | -- | ४१४६॥ |

- **इतर खर्च व खरेदी -** कोतवाली खात्याच्या खर्चाची माहिती देताना तक्ता ७ मधील उभा रकाना ५ मध्ये इतर खरेदी खर्च आहे त्याचे विवरण या तक्ता १० मध्ये दिलेले आहे. कोतवाली खात्याच्या इतर खर्च व खरेदी खर्चात साहित्य खरेदी, कोतवालासाठीच्या घोड्यांसाठी खर्च, घरे खरेदी आकार, श्रीनिवास देसाई या व्यक्तीला दिलेली धर्मार्थ रक्कम, तसेच बातमी खर्च यांचा समावेश होते. अशा प्रकारे कोतवाली खात्या संदर्भात खर्चाच्या बाबी आहेत.

**तक्ता १० कोतवाली खात्याचा खर्च – इतर खर्च व खरेदी**

| शिर्षक | १७६६-६७[xxx] | १७८३-८४[xxxi] | १७८५-८६[xxxii] | १७९२-९३[xxxiii] |
|---|---|---|---|---|
| एकूण | १७४ | १६२७॥ | २०९५ ६≡ | १९४८ |
| साहित्य खरेदी | २६ (लोखंडी बेड्या) | २५ (अफ्तागीर वैगेरे) | --- | --- |
| घोडे निसबत कोतवाल- गैरसनदी खर्च | १४८ | १०७ | १८५ | ३३०।= |
| घरे खरेदी आकार | --- | १३०५॥ | १८७० | १५४१॥।= |
| श्रीनिवास देसाई | --- | ४० | ४० | ४० |
| बातमी खर्च | --- | १५० | --- | --- |

कोतवाली ही शहर प्रशासनाच्या दृष्टीने उपयुक्त बाब होती. या व्यवस्थेने शहराच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. कोतवाली खात्यात शिबंदी व प्याद्यांची संख्या इ.स. १७८२ पर्यंत ७८ होती ती इ.स. १७८२ मध्ये ९०, इ.स. १७९० मध्ये ११५ झाली आणि या साली एकूण कोतवालीतील लोकांची संख्या २१२ इतकी झाली होती.[xxxiv] यावरून कोतवाली खात्याचा वाढता व्याप लक्षात यावा. कोतवालीची अर्थव्यवस्था पाहता कोतवालीची जमाखर्चाची रक्कम इ.स. १७६६-६७ रू. १४१६१।=॥।, इ.स. १७८३-८४ साली रू. ६२५४८।=॥, इ.स. १७९२-९३ ला रू. ४५८३९॥=॥ होती. इ.स. १८०१-०२ साली कोतवाली खात्याची मक्ता रक्कम ५०००१ रु. होती. हे सर्व आकडे कोतवालीचे महत्त्व व्यक्त करतात.

डॉ. पुष्कर शास्त्री यांच्या मतानुसार, दुसऱ्या बाजीरावच्या काळात कोतवाली खात्याचा दर्जा खालवला. निव्वळ उत्पन्न देणारे एक खाते याच दृष्टीने कोतवाली खात्याकडे पाहिले गेले. त्यावरील खर्च कमी करून उत्पन्न कसे वाढविता येईल याचाच विचार करण्यात आला होता. एकाच वेळी दोन कोतवाल नेमल्याचा दाखला दुसऱ्या बाजीरावच्या काळातच मिळतो. कचोराम व गंगाधर बाळकृष्ण मराठे या दोघांना एकाच वेळी कोतवाल नेमण्यात आले होते.[xxxv] अशा प्रकारे शहरीकरणाच्या प्रक्रियेसाठी कोतवालीचे महत्व आणि कोतवालीची अर्थव्यवस्था होती.

1. पुष्कर रमेश शास्त्री, **पेशवेकालीन पुणे शहरातील कोतवाली**, २०१३, पृ. ८-९.
2. कित्ता.
3. कित्ता.
4. कित्ता, पृ. १९-२१.
5. चिंतामण गणेश कर्वे (संपा.), पुणेनगर संशोधन वृत्त खंड-२, पुर्वोक्त, पृ. १६१-१६२.
6. पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास दप्तर, रुमाल क्रमांक ५१, ताळेबंद, शहर पुणे, कोतवाली, सु.स. सबा सितैन मया अलफ.
7. कित्ता, सु.स. अर्बा समानिन मया अलफ.
8. कित्ता, सु.स. सलास तिसैन मया अलफ.
9. कित्ता, सु.स. सबा सितैन मया अलफ.
10. कित्ता, सु.स. अर्बा समानिन मया अलफ.
11. कित्ता, रुमाल क्रमांक ५७०, बटछपाई, सन तिसा सबैन मया अलफ.
12. कित्ता.
13. पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास दप्तर, रुमाल क्रमांक ५१, ताळेबंद, शहर पुणे, कोतवाली, सु.स. अर्बा समानिन मया अलफ.
14. पुष्कर रमेश शास्त्री, पुर्वोक्त पृ. ३९.
15. पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास दप्तर, रुमाल क्रमांक ५१, ताळेबंद, शहर पुणे, कोतवाली, सु.स. सबा सितैन मया अलफ.
16. कित्ता.
17. कित्ता.
18. कित्ता.
19. कित्ता.
20. कित्ता.
21. कित्ता.
22. कित्ता.
23. कित्ता.
24. कित्ता.
25. कित्ता.
26. कित्ता.
27. कित्ता.
28. कित्ता.
29. कित्ता.
30. कित्ता.
31. कित्ता.
32. कित्ता.
33. कित्ता.
34. पुष्कर रमेश शास्त्री, पुर्वोक्त, पृ. ७९.

[xxxv] पुष्कर रमेश शास्त्री, पुर्वोक्त, पृ. ३९.